होती. कारण हा माणूस अण्णांच्या गोतावळ्यात एकदम वीजोड वाटणारा होता. अण्णांच्या लोकप्रियतेचा लाभ उठवण्यासाठी हा तिथे आला की विश्वासघात करण्यापूर्वी विश्वास संपादन करण्यासाठी तिथे पोहोचला ही माझी शंका होती. दीड महिन्यात परुळेकरांनी ती खरी करून दाखवली. केतकर ज्याला शहाजोगपणा म्हणतात. त्याचे मूर्तीमंत रुप म्हणजे राजू परुळेकर त्यांचा अण्णा टीमवरील आरोप बारकाईने वाचला तरी त्याचीच साक्ष मिळेल. ज्या लोकांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्रात बहुतांशी निष्प्रभ झालेल्या अण्णांचे आंदोलन दिल्लीत नेऊन राष्ट्रीय पातळीवर यशस्वी केले त्यांनीच आज अण्णांची राष्ट्रीय प्रतिमा घडवली आहे. त्यात किरण बेदी, केजरीवाल व भूषण पितापूत्रांचा समावेश होतो. त्या धावपळीच्या कालखंडात परुळेकर तिकडे अजिबात फिरकले नव्हते. त्या प्रयत्नांना यश येईपर्यंत परुळेकर तिकडे ढुंकून पाहायला तयार नव्हते. त्यावेळी अण्णा त्यांना महत्त्वाचे वाटत नव्हते. इतरांच्या मेहनतीने अण्णांचे महात्म्य वाढल्यावर राजू परुळेकर आयत्या बिळावर बसायला धावले. त्यासाठी अर्थातच विजय कुवळेकर यांना सोबत घेऊन गेले. अण्णांचे महात्म्य वाचवायचा आव त्यांनी आता आणला आहे आणि ज्यांनी अण्णांना मोठे केले, त्यांच्यापासूनच अण्णांना धोका असल्याचा जावईशोध त्यांनी लावला आहे. त्यात नवल नाही. अर्धसत्य साईबाबांचा भक्त पूर्णसत्य कसे सांगेल? 'अर्धसत्य' चित्रपटाचे कथानक लिहिणारे विजय तेंडुलकर यांना गुरू मानणारे राजूभाई पूर्ण सत्य सांगतील का? एका वृत्तवाहिनीच्या संपादकाने तर राजू परुळेकर यांची 'अट्टल बदमाश' म्हणून संभावना केली आहे. अगदी जाहीरपणे त्या पुराव्याची पटपडताळणी आपण उद्याच्या अकांत करू. (क्रमशः)